# राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेसमोर

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती
संभाजीनगर,बचत भवन लेखा व कोषागार
कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर
-४३१००१

**तक्रार क्र.१९८२/२०१९/छ.संभाजीनगर**
**(द्वितीय अपील क्र.६१२/२०१९मध्ये)**

श्रीमती कापसा उर्फ कुसुम दादाराव खंडागळे, : तक्रारदार
द्वारा-नानुबाई सहकारी देहाडे,कांचनवाडी कश्मिरनगर,
लक्ष्मीमाता मंदिराजवळ,छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,छत्रपती
संभाजीनगर

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी
वैद्यकीय अधिक्षक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व
रुग्णालय,छत्रपती संभाजीनगर

**निर्णय**
**(सुनावणी दि.२३.०४.२०२४)**

तक्रारदार यांनी दि.२९.११.२०१९रोजी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.त्यामध्ये "तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रार अर्जात खालीलप्रमाणे तक्रार केलेली आहे. वैद्यकीय अधिका-यांनी योग्य माहिती न दिल्याबद्दल माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार अर्ज दाखल करीत आहे."

सदर आदेशाची अंमलबजावणी केली नाही,अशी तक्रार करुन संबंधितावर नियमानुसार कार्यवाही करावी, अशी मागणी तक्रारदाराने केली आहे.

आयोगाने द्वितीय अपील क्र.६७०/२०१९ मध्ये दि.२७.०५.२०१९ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेले होते.

"वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे परिपूर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. "

सदर प्रकरणावर आज दि.२३.०४.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली आहे. सदर सुनावणीला तक्रारदार आणि त्यांच्यामार्फत विधिज्ञ श्री.सी.एस.गवई व डॉ.श्री.विकास एम.राठोड, तत्कालीन जन माहिती अधिकारी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर तसेच डॉ.कै.उ.झिने,तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्राध्यापक व विभाग प्रमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर नमुद सर्वजन सुनावणीसाठी उपस्थित आहेत.

सुनावणीच्यावेळी तक्रारदार व विधिज्ञ श्री.सी.एस.गवई यांनी केलेल्या युक्तिवादानुसार त्यांना मुद्दा क्र.४ रक्ताचा सि.ए. रिपोर्ट मुद्दा क्र.५ बाबत मुत्युची वेळ अचूक देण्यात यावी. या मुद्दाची माहिती मिळाली नाही, असे कथन केले. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कथन केले की, दि.१८.११.२०१९ रोजीच्या पत्रान्वये माहिती अर्जातील मुद्दा क्र.४ व क्र.५ ची वस्तुस्थिती तक्रारदार यांना कळविण्यात आली आहे. तक्रारदार यांनी त्यांच्या मुलीच्या मुत्युविषयी संशय व्यक्त केला आहे. त्यासाठी त्यांनी प्रचलित कायदामध्ये उपलब्ध असलेल्या तरतुदीनुसार सक्षम सार्वजनिक प्राधिकारणाकडे दाद मागू शकतात.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रकरणातील वस्तुस्थिती तक्रारदारास कळविली आहे. यावरुन आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी केली असल्याचे स्पष्ट होते. तसेच तक्रारदार यांनी त्यांच्या मुलीच्या मुत्युसंदर्भात असलेल्या संशयासंदर्भात सक्षम सार्वजनिक प्राधिकारणाकडे दाद मागावी, यासर्व वस्तुस्थितीनुसार सदरची तक्रार निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त विवेचनानुसार सदर तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**( मकरंद रानडे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

तक्रार क्र.१९८२/२०१९/छत्रपती संभाजीनगर जावक क्र. 6457 /२०२४ दिनांक : 25/04/2024

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ छत्रपती संभाजीनगर ★ सत्यमेव जयते